**खुली ई - निविदा**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत राज्यातील स्वयं सहायता समूहातील महिलांचा औरंगाबाद येथे महामेळावा आयोजन करण्यासाठी सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी पुरवठादार संस्था निवड करण्याबाबत

निविदा संदर्भ क्रमांक: एमएसआरएलएम/एसएमएमयु/महामेळावा/औरंगाबाद/ २०१९

ई- निविदा क्रमांक (ID) : 2019_MSRLM_483338

दिनांक:- २७/८/२०१९

-जारी कर्ता–

मुख्य कार्यकारी अधिकारी

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष

५वा मजला ,सिडको भवन ,दक्षिण बाजू , सीबीडी बेलापूर ,नवी मुंबई -४००६१४

संकेतस्थळ- http://www.umed.in

## १) निविदा (Bid) सादर करण्यासाठी निमंत्रण:-

अ) दीन दयाल अंत्योदय योजना, हि योजना ग्रामीण भागातील गरीबी निर्मूलनासाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने सुरू केलेली महत्वाकांक्षी योजना आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम-उमेद) २०११ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एनआरएलएम) - आजीविका यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली. गरिबांच्या शाश्वत जीवनशैलीचा मार्ग म्हणून कार्य करणाऱ्या समाजावर आधारित संस्था तयार करून त्यांची मजबुती करून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. अभियान राज्यात इंटेन्सिव पद्धतीने राबविण्यात येत आहे. उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनीन्नती अभियान यांचे राज्य कार्यालय , सी.बी.डी. बेलापूर ,नवी मुंबई येथे असून जिल्हा स्तरावर अभियानाचे अंमलबजावणी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षा मार्फत तसेच तालुका स्तरावर तालुका अभियान व्यवस्थापन कक्षा मार्फत करण्यात येते .

आ) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत राज्यातील सर्व जिल्हातील समूह संस्थांचे महिला सदस्यांचा महा मेळावा औरंगाबाद येथे आयोजित करावयाचा आहे. सदर मेळाव्याकरीता साधारणातः एक लाख महिला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. तरी त्याकरिता मोठ्या प्रमाणात मंडप व इतर व्यवस्था करणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमाकरीता सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी ठेकेदाराची निवड खुली ई - निविदा मागविण्यात येत आहे.

इ) सदरची निविदा दोन किंवा अधिक निविदाधारक एकत्रित रित्या सादर करता येणार नाही (Joint Venture/ Consortium)

ई) या सूचनेच्या प्रतिसादात आपली निविदा सादर करण्यापूर्वी निविदाधारकांना या निविदा दस्तऐवजाचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याची सल्ला देण्यात येत आहे. या निविदेच्या प्रतिसादात जे निविदाचा सादर करतील त्यांनी या निविदा सूचनाचा काळजी पूर्वक अभ्यास आणि या दस्तऐवजाची तपासणी केल्यानंतर सर्व अटी, नियम त्यांचे परिणाम समझून घेतले असे मानले जाईल.

उ) सर्व पात्र व ईच्छुक निविदा धारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा प्रणालीचा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

ऊ) निविदाधारक (Bidder) यांना त्याची तांत्रिक आणि आर्थिक प्रस्ताव (Bid) या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ऑनलाइन सादर करणे आहे. निविदा शुल्क (Tender Fee) आणि बयाना ठेव (Earnest Money Deposit) निविदा दस्तऐवजात दिलेल्या तपशीलानुसार ऑनलाइन सादर करणे अनिवार्य आहे.

ऋ) कोणत्याही कारणामुळे निविदा ऑनलाइन सादर करण्यात कोणताही विलंब किंवा त्रुटीसाठी निविदा जारी कर्ता जबाबदार राहणार नाही. यासाठी, निविदाधारकांना विनंती केली जाते की संपूर्ण आवश्यक निविदा दस्तऐवज (Bid Documents), आंतरजाळ (Internet) मंद गती किंवा इतर कोणत्याही अनपेक्षित समस्या टाळण्यासाठी आधीपासूनच आनलाईन सादर करणे आवश्यक आहे. निविदा (Bid) सादर करण्यासंबंधित काही अडचणी असल्यास निविदाधारक https://mahatenders.gov.in वर दिलेल्या मदत कक्षाशी (हेल्पडेस्क) संपर्क करावा.

ऌ) निविदा संदर्भात किवा सदर कामासंदर्भात कुठलाही वाद उत्पन्न झाल्यास तो मुंबई /ठाणे न्यायालयाच्या न्यायकक्षेत राहील.

## २. निविदेची वेळापत्रक खालील प्रमाणे राहील:-

| माहिती | तपशील |
|---|---|
| निविदा संदर्भ क्रमांक | एमएसआरएलएम/एसएमएमयु/महामेळावा/औरंगाबाद/२०१९ |
| ई निविदा आयडी | 2019_MSRLM_483338 |
| निविदा दस्तऐवज डाउनलोड सुरु होण्याची दिनांक आणि वेळ | दिनांक:- २७ / ०८ /२०१९ , वेळ : १३.०० |
| स्पष्टीकरणासाठी विनंती करण्याची अंतिम दिनांक आणि | दिनांक:- ३१/८/२०१९ , वेळ : १४.०० |

| | |
|---|---|
| वेळ | |
| निविदा सादर करण्यापूर्वी बैठक (Pre Bid Meeting) चा दिनांक वेळ आणि स्थळ | दिनांक:- ३१/८/२०१९ , वेळ : १४.०० स्थळ- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५वा मजला ,सिडको भवन ,दक्षिण बाजू , सीबीडी बेलापूर ,नवी मुंबई -४००६१४ |
| निविदा दस्तऐवज डाउनलोड करण्यासाठी अंतिम दिनांक आणि वेळ http://mahatenders.gov.in | दिनांक:- ०५/०९ /२०१९, वेळ : १६.०० |
| निविदा (Bids) सादर करण्यासाठी शेवटची दिनांक आणि वेळ (अंतिम मुदत) | दिनांक:- ०५/०९ /२०१९, वेळ : १६.०० |
| तांत्रिक लिफाफा ऑन लाईन उघडण्यासाठी दिनांक आणि वेळ | दिनांक:- ०६/०९ /२०१९, वेळ : १६.०० नंतर |
| वित्तीय लिफाफा ऑन लाईन उघडण्यासाठी दिनांक आणि वेळ | https://mahatenders.gov.in वर प्रकाशित केले जाईल |
| संपर्कासाठी आणि निविदा उघडण्यासाठी ठिकाण | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५वा मजला ,सिडको भवन ,दक्षिण बाजू , सीबीडी बेलापूर ,नवी मुंबई -४००६१४ |

सूचना : १. निविदा उघडण्याच्या ठराविक तारखेस खरेदीदारासाठी सुट्टी जाहीर केली असेल तर पुढील कामकाजाच्या दिवशी त्याच वेळेला व त्याच ठिकाणी निविदा उघडल्या जातील.

२.उपरोक्त दिनांक आणि वेळेमध्ये बदलू होऊ शकतो तरी निविदाधारकानी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नमूद केलेल्या सर्व तारखा व वेळ ही अंतिम असेल.

**३. निविदा संबंधित इतर महत्वाची माहिती:-**

| अ. क्र. | माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | निविदा शुल्क (विना परतावा) | रु. ३०००/- निविदा सादर करताना ई-निविदा पोर्टलवर ऑनलाईन जमा भरावे लागतील. |
| २ | बयाना ठेव (Earnest Money Deposit) | रु. १,००,०००/- निविदा सादर करताना ई-निविदा पोर्टलवर ऑनलाईन भरावे लागतील. |
| ३ | निविदा व बयाना ठेव वैधता कालावधी | तांत्रिक निविदा उघडण्याच्या तारखेपासून ३० दिवस |
| ४ | कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) | सादर करण्यात आलेल्या आर्थिक प्रस्तावाच्या ५% रक्कम |
| ५ | बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात कामगिरी सुरक्षा रक्कम /अनामत रक्कम (Performance Security Deposit) देण्यासाठी अंतिम दिनांक | Letter of Acceptance / Work Order प्राप्त झाल्यापासून एक आठवड्यांच्या आत संबधित निविदाधारकाने कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात जमा करणे बंधनकारक आहे . त्याची वैधता करार पूर्ण झाल्यानंतर ३० दिवसांपर्यत असेल. |

आर.विमला भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
५वा मजला ,सिडको भवन ,दक्षिण बाजू , सीबीडी बेलापूर ,नवी मुंबई -४००६१४
संकेतस्थळ- http://www.umed.in

**४. बयाना जमा (Earnest Money Deposit):-**

अ) http://mahatenders.gov.in या संकेत स्थळाव्दारे ऑनलाइन पेमेंट गेटवेव्दारे मुद्दा क्र. 3 मध्ये उल्लेखित बयाना (Earnest Money Deposit) जमा करणे अनिवार्य आहे.

आ) ज्या निविदादारांनी वर नमूद केल्याप्रमाणे आणि निर्धारित बयाना (Earnest Money Deposit) जमा केलेले नाही त्यांची निविदा (Bid) नाकारली जाईल.

इ) अयशस्वी निविदाधारकाची बयाना रक्कम (Earnest Money Deposit) निविदा निश्चितीकरण झाल्यानंतर व यशस्वी/निवड करण्यात आलेल्या निविदाधारकाने कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम जमा केला नंतर किंवा निविदा व बयाना ठेव वैधता कालावधी या मध्ये जे अगोदर असेल त्यानुसार विना व्याज online परत करण्यात येईल.

ई) यशस्वी निविदादाराचे बयाना (Earnest Money Deposit) जमा करार करण्यात आल्यानंतर आणि निश्चित कालावधीत बँक गॅरंटी / डिमांड ड्राफ्ट स्वरुपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) जमा केल्यानंतर आणि निविदा दस्तऐवजामध्ये नमूद केल्यानुसार परत केली जाईल.

**५. बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्ती -**

अ) निविदाच्या वैधतेच्या कालावधीत निविदाधारक आपली निविदा परत घेत असेल किंवा निविदाच्या वैधतेच्या कालावधीत किंवा त्याच्या वाढीव कालावधीच्या दरम्यान निविदाचे मूल्य वाढवेल तर बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्यात येईल.

आ) यशस्वी निविदाधारक निश्चित केलेल्या कालावधीत करारावर सही करण्यास अयशस्वी ठरला किंवा निविदा दस्तावेजात दिलेल्या नमुन्यानुसार निश्चित कालावधीत बँक गॅरंटी / डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) जमा करण्यास अयशस्वी ठरला तर बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्यात येईल.

इ) निविदा प्रक्रियेदरम्यान निविदा धारकाच्या विचार पूर्वक करण्यात आलेल्या चुकी च्या कृती मुळे मूल्यांकन आणि अंतमीकरण प्रक्रियेत अनावश्यकपणे विलंब झाल्यास संबंधित निविदाधारकाची बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्यात येईल. बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्याबाबत निविदा जारी कर्ता यांचा निर्णय अंतिम असेल आणि ती निविदाधारकांवर बंधनकारक असेल.

ई) जर निविदा प्रक्रियेदरम्यान निविदाधारकाने देण्यात आलेली कोणतीही माहिती चुकीची आढळली तर निविदा जारीकर्ता संबंधित निविदाधाकाची निविदा (Bid) रद्द करू शकतात व संबंधित निविदादारावर आवश्यक कार्यवाही करू शकतील.

**६. संपर्क तपशील:-**

निविदा दस्तऐवज संबंधी कोणत्याही स्पष्टीकरण व संपर्कासाठी, निविदाधारकांना खाली प्रदान केलेल्या संपर्क माहितीवर संवाद साधता येईल.

| अ.क्र. | संपर्क तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | पद | राज्य अभियान व्यवस्थापक –संपादणूक |
| २ | कार्यालयीन पत्ता | उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान<br>राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष ,५वा मजला ,सिडको भवन ,दक्षिण बाजू ,<br>सीबीडी बेलापूर ,नवी मुंबई -४००६१४ , फोन नं: ०२२-२७५६२५५२/५४<br>संकेतस्थळ: www.umed.in |

**७. निविदा सादर करण्यापूर्वी ची विचारणा आणि निविदा सादर करण्यापूर्वी ची बैठक:-**

निविदा जारी कर्ता संभाव्य निविदादारांचे निविदा संदर्भात काही प्रश्न असल्यास निविदा सादर करण्यापूर्वी निविदा पूर्व बैठक आयोजित करेल. बैठकीची तारीख, वेळ आणि स्थान निर्दिष्ट केलेल्या भाग २ मध्ये निर्दिष्ट केले आहे. निविदादाराचे प्रतिनिधी त्यांच्या स्वतःच्या खर्चावर निविदा सादर करण्यापूर्वी ची बैठक मध्ये उपस्थित राहून लिखित स्वरुपात प्रश्न किवा शंका विचारू शकतात. निविदा सादर करण्यापूर्वीच्या उपस्थित केलेल्या प्रश्नांची / शंकांची प्रतिक्रिया / निर्णय https://mahatenders.gov.in वर प्रकाशित केली जाईल. कोणत्याही दूरध्वनी / भ्रमणध्वणी व्दारे विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. निविदा सादर करण्यापूर्वी प्रश्नाच्या उत्तराबाबतचा निविदा जारी कर्ताचा प्रतिसाद निविदा दस्तऐवजाचा अविभाज्य भाग बनेल.

**८. निविदा सादर करण्यापूर्वी ची विचारणा / शुल्क / निविदा करण्यासाठी दुरुस्तीस प्रतिसाद:-**

निविदा जारी कर्ता कोणत्याही वेळेस, कोणत्याही कारणास्तव, स्वतःच्या पुढाकाराने किंवा निविदाधारकाव्दारे विनंती केलेल्या स्पष्टीकरणांच्या उत्तरदायित्वाच्या वेळेस (किंवा निविदा जारीकर्ताने विस्तारित केलेल्या) किंवा आधी कोणत्याही वेळेस शुद्धीपत्रक  जारी करुन निविदा दस्तावेजामध्ये बदल करू शकतो किंवा निविदाच्या तरतूदींच्या व्याख्या स्पष्ट करण्यासाठी अतिरिक्त सूचना निर्गमित करू शकतो . निविदा जारीकर्ता जारी केलेल्या निविदा दस्तऐवजातील दुरुस्ती / शुध्दिपत्रक https://mahatenders.gov.in वर प्रदर्शित केले जाईल आणि या निविदा दस्तऐवजात या संदर्भाव्दारे समाविष्ट केले जाईल असे मानले जाईल. अशा कोणत्याही दुरुस्ती सर्व निविदाधारकावर बंधनकारक असेल. संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या बदलांच्या आधारावर निविदा सूचना/ निविदा दस्तऐवज अदृयावत  करण्याच्या निविदाधारकाच्या अपयशामुळे या निविदा दस्तऐवजाच्या तरतुदींच्या कोणत्याही चुकीच्या अर्थासाठी निविदा जारीकर्ता जबाबदार नाही. शुध्दिपत्रक विचारात घेणे व त्याअनुशंगाने निविदाधारकांना त्यांची निविदा तयार करण्यासाठी उचित वाजवी कालावधी देण्यासाठी निविदा जारीकर्ता निविदा सादर करण्यासाठी अंतिम मुदत वाढवू शकतो.

**९. प्रतिसाद पूर्णत्व:-**

अ) निविदाधारकांना निविदा दस्तऐवजात सर्व निर्देश, फॉर्म, अटी व शर्ती , आवश्यकता आणि इतर माहितीचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याची सल्ला देण्यात येत आहे. निविदा दस्तावेज काळजीपूर्वक समजून घेतल्यानंतर आणि त्याच्या पूर्ण अर्थ समजून घेतल्यानंतर निविदा सादर करण्यात आलेली आहे असे मानले जाईल.

आ) या निविदाचा प्रतिसाद पूर्णतः असावा. निविदा दस्तावेजामध्ये नमूद आवश्यक सर्व माहिती सादरकरण्यात अयशस्वी किंवा प्रत्येक बाबतीत निविदा दस्तऐवजास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद न देणाऱ्या निविदाधारकाची निविदा जोखमी मध्ये असेल आणि परिणामी त्याची निविदा नाकारली जाऊ शकते.

**१०. निविदा तयार करण्याचा खर्च:-**

निविदाधारकास निविदा मध्ये सहभाग होण्यासाठी येणारा सर्व खर्च स्वतः करणे आहे . निविदा जारीकर्ता कोणत्याही होणाऱ्या खर्चास जबाबदार राहणार नाही.

**११. राइट टू टर्मिनेशन:-**

निविदा जारीकर्ता कोणत्याही वेळी कोणत्याही कारणाशिवाय निविदा प्रक्रिया समाप्त करू शकतो . निविदा जारीकर्ता कोणतीही वचनबद्धता व्यक्त करीत नाही की या प्रक्रियेमुळे कोणाशीही व्यवसायातील व्यवहारावर परिणाम होईल. जर निविदा प्रक्रिया निरस्त करण्यात आली तर कोणत्याही व्याजाशिवाय सर्व निविदादारांचे बयाना ठेव (Earnest Money Deposit) परत केले जाईल.

**१२ निविदामध्ये त्रुटी नसणे:-**

निविदामध्ये कोणतीही त्रुटी नसणे आवश्यक आहे. कोणत्याही अधिलेखनाच्या / दुरुस्ती च्या बाबतीत, अधिकृत स्वाक्षरीकर्त्याव्दारे अधिलेखनाच्या / दुरुस्ती च्या जागेवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

**१३. पेटंट हक्क:-**

तृतीय पक्ष / वितरक / पुरवठादार / अभिकर्ता पैकी कॉपीराईट, पेटंट, ट्रेडमार्क किंवा औद्योगिक डिझाइन अधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकृत विक्रेत्यांनी केलेल्या कोणत्याही दाव्याच्या बाबतीत संबधित निविदाधारक वैयक्तिक जबाबदार राहील. जर निविदाधारक पालन करण्यास अयशस्वी ठरला आणि निविदा जारीकर्ता अशा प्रकारच्या उल्लंघनामुळे तृतीय पक्षाला रक्कम अदा करने आवश्यक असेल तर निविदाधारक न्यायालयात प्रकरण व अभिवक्ता शुल्क इत्यादींशी संबंधित सर्व दाव्याच्या खर्चासह भरपाईसाठी जबाबदार असेल. निविदाजारीकर्ता अशा कोणत्याही दाव्यावर यशस्वी निविदाधारकाला सूचना देईल आणि आवश्यक असल्यास निविदाधारकाकडून वसुलीची कार्यवाही करेल.

**१४. निविदामध्ये सहभागी होण्यासाठी पात्रता अटी/निष्कर्ष :-**

निविदा सादर करण्याच्या दिनांकाला निविदाधारकला स्वतंत्रपणे खालील पात्रता निकष पूर्ण करणे अनिवार्य आहे.

क) सक्षम प्राधिकारी यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र ( मुंबई दुकान व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत शॉप ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत/ कंपनी /फर्म /एमएसएमई इत्यादी ).

ख) निविदाधारकाची तीन आर्थिक वर्षात २०१५-१६ , २०१६-२०१७ व २०१७-१८ किंवा आर्थिक वर्ष २०१६-१७,२०१७-१८,२०१८-१९ चे किमान सरासरी वार्षिक उलाढाल रु. १०० लक्ष पेक्षा कमी असू नये.

ग) शासकीय /निमशासकीय / खाजगी संस्थेसाठी निविदाकार यांनी या पध्दतीचे मंडप उभारणीचे व इतर अनुषंगिक कामे केल्याचा किमान रु. ९० लक्ष अथवा त्यावरील रकमेचे किमान ०१ काम केलेले असणे आवश्यक आहे.

घ) निविदाधारक वस्तू व सेवा कर (GST) अंतर्गत नोंदणीकृत असावा.

ङ) निविदाधारक निविदा सादर केल्याच्या तारखे पर्यंत कोणत्याही राज्य शासन किंवा केंद्र सरकार विभाग / केंद्रशासित प्रदेश / स्थानिक प्राधिकरणव्दारे काळीसूचीबद्ध किंवा बहिष्कृत केलेला नसले पाहिजे.

**१५. ऑनलाइन निविदा सादर करण्याबाबत:-**

निविदाधारक ई-निविदा संकेत स्थळ https://mahatenders.gov.in व्दारे ऑनलाईन निविदा सादर करणे आहे. सादर केलेल्या निविदामध्ये तांत्रिक आणि आर्थिक लखोटे समाविष्ट असतील. निविदाधारकाने हे निविदा दस्तऐवजात नमूद केलेले सर्व आवश्यक कागदपत्रे निविदासह आणि निर्धारित नमुन्यातच सादर केले पाहिजेत. आवश्यक कागदपत्रे सादर न करने किंवा कागदपत्रे वेगवेगळया स्वरूपात सादर केल्यामुळे निविदा नाकारली जाऊ शकते. या निविदा दस्तऐवजाच्या प्रतिसादात सादर केलेली सर्व निविदा सर्व बाबतीत बिनशर्त असली पाहिजेत, नसल्यास निविदा जारीकर्ता कडे निविदा नाकारण्याचा अधिकार सुरक्षित राहतो. निविदेचा भाग म्हणून सादर केलेल्या आवश्यक कागदपत्राचे प्रत्येक पृष्ठ मुद्रित केले गेले आहे आणि अधिकृत स्वाक्षरीकर्त्याव्दारे योग्यरित्या स्वाक्षरी केलेले आहे हे तपासण्यासाठी निविदाधारकाची जबाबदारी असेल. कोणत्याही कारणास्तव निविदा सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर निविदा सादर होणार नाही त्यामुळे इच्छुक निविदाधारकांनी शेवटच्या क्षणी निविदासादर करणे टाळावे.

**अ.तांत्रिक लिफाफा:-**

इच्छुक निविदाधारकांनी खालील तांत्रिक कागदपत्रे ऑनलाइन सादर केली जाणे आवश्यक आहे.

क) फॉर्म - १ प्रमाणे निविदा प्रपत्र.

ख) फॉर्म - २ मधील निविदाधारकाच्या व्यवसायाचा तपशील.

ग) फॉर्म-३ नुसार सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंस) यांचे तीन आर्थिक वर्ष २०१५-१६ , २०१६-२०१७ व २०१७-१८ किंवा आर्थिक वर्ष २०१६-१७,२०१७-१८ व २०१८-१९ चे आर्थिक उलाढालीचे प्रमाणपत्र

घ) सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंस) यांचे आर्थिक वर्ष २०१५-१६ , २०१६-२०१७ व २०१७-१८ किंवा आर्थिक वर्ष २०१६-१७,२०१७-१८ व २०१८-१९ या वर्षांचे लेखापरिक्षण अहवाल

च) फॉर्म-४ निविदासादर करण्याच्या दिनांक पर्यंत सरकारी उपक्रम किंवा सरकारी संस्था, राज्य सरकार किंवा केंद्र सरकार विभाग / केंद्रशासित प्रदेश / स्थानिक प्राधिकरण / केंद्र आणि राज्य व्दारे काळया यादीत समाविष्ट नसल्याचे १०० /- च्या गैर-न्यायिक मुद्रांक पेपर घोषणापत्र.

छ) फॉर्म-५ शासकीय /निमशासकीय / खाजगी संस्थेसाठी निविदाकार यांनी या पध्दतीचे मंडप उभारणी व इतर अनुषंगिक कामे केल्याचा किमान रु.९० लक्ष अथवा त्यावरील रकमेचे किमान ०१ काम केल्याबद्दलचे निविदाधारक यांनी संबंधित संस्थेकडील कार्यारंभ आदेश व काम पुर्णत्वाचे दाखले अथवा देयकाच्या प्रती जोडणे आवश्यक आहे.

ज) मुंबई दुकान व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत शॉप ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत असल्याचे किंवा इतर सक्षम प्राधिकारी यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र.

झ) वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र

**ब. आर्थिक लिफाफा:-**

- संकेत स्थळावरील निर्देशानुसार व्यापारिक/ वित्तीय लखोटा https://mahatenders.gov.in वर ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.
- निविदा आणि स्वीकारलेले दर निश्चित कालावधीसाठी निविदाधारकास बंधनकारक असतील आणि कोणत्याही कारणाने करार कालावधी पूर्ण होईपर्यंत त्यात बदल केला जाणार नाही.

**१६. निविदा वैधता:-**

निविदा कलम 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी वैध असेल. त्या पेक्षा कमी कालावधीसाठी वैध असलेली निविदा नाकारली जाईल . अपवादात्मक परिस्थितीत निविदा जारीकर्ता त्यांच्या गरजेनुसार निविदाची वैधता कालावधी वाढवण्याबाबत निविदाधारकांना विनंती करू शकते. त्याची विनंती आणि प्रतिसाद लिखित किंवा ईमेलव्दारे केले जातील. निविदाधारक निविदा वैधता कालावधी वाढवण्याबाबत नकार देऊ शकतो परंतु अशा परिस्थितीत सदरच्या निविदाधारकास निवड प्रक्रियेतून काढून टाकले जाईल. सदर निविदाधारकाची बयाना रक्कम जप्त करण्यात येणार नाही.

**१७. व्यावसायिक निविदा / वित्तीय निविदामध्ये त्रुटी / सुधार:-**

निविदाधारकांना किंमती सादर करण्यास पुरेसी काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. निविदा जमा केल्याच्या शेवटच्या तारखेनंतर सादर केलेल्या आकडेवारी मध्ये कोणत्याही परीस्थितीत बदल होणार नाही. निविदा मध्ये अंकगणित त्रुटींसाठी असल्यास निविदा जारीकर्ता त्यामध्ये दुरुस्त केली जाईल व ती निविदाधारकास बंधनकारक राहील. ( एकूण केलेली बेरीज रक्कम चुकली असल्यास प्रती नग/युनिट दर ग्राह्य धरून त्यानुसार एकूण बेरीज करून येणारी रक्कम ग्राह्य धरली जाईल. तसेच अंक लिहण्यात चूक झाली असल्यास अक्षरात लिहलेली रक्कम ग्राह्य धरली जाईल.)

**१८. अपात्र निविदा:-**

ज्या निविदा खालील बाबीची पूर्तता करणार नाही ती निविदा असुसंगत निविदा म्हणून विचारात घेऊन अपात्र असेल.

अ) निविदा दस्तऐवजाच्या आवश्यकतांचे पालन करीत नाही.

आ) निविदा दस्तऐवजा मध्ये विनंती केलेल्या विविध प्रारूपाचे (Format) चे पालन करत नाही.

इ) निविदा जारीकर्ता ने निर्दिष्ट केलेल्या अहर्ता पूर्ण करत नसेल.

ई) निविदा च्या वैधते दरम्यान किंवा त्याची वाढीव कालावधी दरम्यान निविदाधारक सादर किंमती वाढवेल.

उ) निविदाधारक स्वत: च्या अटी सह निविदासादर करेल.

ऊ) निविदा अपूर्ण स्वरूपात प्राप्त झाली असेल.

ऋ) तांत्रिक लखोट्या मध्ये अनपेक्षितपणे, अनावश्यकपणे, कराराच्या प्रक्रिये दरम्यान (कोणत्याही अवस्थेत काहीही फरक पडत नाही) किंवा कराराच्या कार्यकाळात किंवा कराराच्या विस्तार कालावधी मध्ये चुकीची माहिती सादर करण्यात आली असेल.

ऌ) व्यावसायिक निविदा (Financial Bid) तांत्रिक लखोट्यासह समाविष्ट करून सादर करण्यात आली असेल.

ऍ) निविदा प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी बेकायदेशीर / भ्रष्ट / फसव्या अर्थाने निविदामूल्यांकनाची प्रक्रिया प्रभावित करण्याचा प्रयत्न केला असेल.

ऎ) जर एखादा निविदाधारक एकापेक्षा अधिक निविदा सादर करेल किंवा दोन किंवा अधिक निविदाधारकांमध्ये सामान्य स्वारस्य (common interests) आढळल्यास, निविदाधारकांना अयोग्य घोषित केले जाण्याची शक्यता असेल.

ए) निविदा जारीकर्ता व्दारे निर्दिष्ट अनुसार निविदाधारक बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) विहित मुदतीत जमा करण्यात अयशस्वी ठरला किंवा विहित मुदतीत करार करून घेण्यास अयशस्वी ठरला.

ऐ) निविदेच्या संदर्भातील कुठल्याही प्रकारचे प्रचार / प्रभाव / चौकशी अयोग्यता मानली जाईल. निविदा चे मूल्यांकन करताना निविदा जारीकर्ताच्या असा ज्ञानात आले कि काही निविदादारांनी संगनमत करून, गठबंधन करून निविदा भरली आहे किंवा काही निविदादारांनी एकत्रित येऊन गठबंधन केल्यामुळे निविदेच्या प्रक्रियेस विलंबझाला असे निविदाधारक तसे करण्यास जबाबदार असतील व ते या करारासाठी तसेच निविदा जारीकर्ताने जारी केलेल्या कोणत्याही निविदा मध्ये भाग घेण्यापासून पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी अपात्र असतील.

ऑ) जर तांत्रिक लखोट्या मध्ये किंमत, किंमत धोरण, मूल्यमापन यंत्रणा किंवा निविदाच्या व्यावसायिक पैलूबद्दल सूचित केलेली कोणतीही माहिती असेल.

**१९. निविदा उघडणे आणि मूल्यांकन प्रक्रिया:-**

निविदा अधिसूचनात नमूद केलेल्या दिनांक व वेळेला नमूद पद्धती नुसार तांत्रिक व व्यवसायिक लिफाफे ऑनलाईन उघडल्या जातील ज्यासाठी निविदाकार स्वत: किंवा त्याचा अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात.

**तांत्रिक दस्तऐवज तपासणी/मुल्यांकन :-**

तांत्रिक निविदाचे मूल्यांकन खालील प्रकारे केले जाईल:

अ) निविदादारांची तांत्रिक निविदाची तपासणी/मुल्यांकन कलम १४ मध्ये नमूद केलेल्या पात्रता निष्कर्ष नुसार केले जाईल.

आ) कोणत्याही वेळी निविदा तपासणी प्रक्रियेदरम्यान निविदा जारीकर्ता निविदाधारकांकडून मौखिक / लिखित स्पष्टीकरण घेऊ शकेल. निविदा जारीकर्ता मूल्यांकन प्रक्रियेत त्यांच्या व्यावसायिक तज्ञांकडून सल्ला घेऊ शकेल. निविदा जारीकर्ता किंवा अधिकृत प्रतिनिधींना कोणताही निर्णय घेण्यापूर्वी निविदा सादर करणाऱ्या निविदादारांची उत्पादन / सेवा/ माल साठा केंद्र तपासण्याचा अधिकार आहे.

इ) निविदादाराद्वारे नमूद केलेल्या मागील अनुभवाची संदर्भ तपासणी करण्याचा निविदा जारीकर्ताला अधिकार आहे. तपासणी दरम्यान मिळालेला कोणताही अभिप्राय तांत्रिक मूल्यांकन प्रक्रियेत विचारात घेतला जाईल.

ई) जे निविदाधारक निविदा मध्ये नमूद केलेल्या सर्व पात्रता अटींची पूर्तता करतील ते तांत्रिकदृष्ट्या प्रात्र असतील.

उ) तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारकांचे व्यावसायिक / आर्थिक लिफाफे उघडण्यात येतील.

**व्यावसायिक / आर्थिक लिफाफे उघडणे:-**

तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारकाची व्यावसायिक/आर्थिक लिफाफा ई-निविदा प्रक्रियेनुसार ऑन लाईन उघडला जाईल. व्यावसायिक निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ online पोर्टल द्वारे कळविण्यात येईल.

**२०. निवड निकष:-**

- निविदा जारीकर्ता एकूण न्युयतम रक्कमे सादर करणाऱ्या निविदाधारकाची (एल-१ निविदाधारक ) निवड करेल.
- निविदा जारीकर्ता यांनी एकापेक्षा अधिक सेवा पुरवठादार निवडीचा अधिकारी स्वतः कडे राखून ठेवला आहे.
- जर कराराच्या कालावधीत कोणत्याही वेळी निविदा सेवासाठीची किंमत केंद्रीय किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही कायद्याच्या किंवा अधिनियमाव्दारे कमी केली गेली असेल तर निविदाकारला नैतिक आणि वैधानिकदृष्ट्या करार केलेल्या किमती कमी होण्याबाबतची माहिती ताबडतोब निविदा जारीकर्ता / खरेदीदाराला सांगणे बंधनकारक असेल. त्यानुसार दर कमी करण्याचा अधिकार असेल.

**२१. कोणतीही निविदा स्वीकारण्याचा आणि कोणत्याही किंवा सर्व निविदानाकारण्याचा अधिकार:-**

कोणतीही निविदा स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार आणि करार करण्याआधी निविदा प्रक्रिया रद्द करण्याच्या आणि कोणत्याही वेळी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार कोणत्याही दायित्वाविना निविदा जारीकर्ता कडे राखून ठेवला आहे.

**२२. निवडीची अधिसूचना:-**

अ) निविदा वैधता कालावधी संपण्यापूर्वी निविदा जारीकर्ता नोंदणीकृत पोस्टव्दारे किंवा फॅक्सव्दारे किंवा ईमेलव्दारे निविदा जारीकर्त्याव्दारे ज्यांची निविदा स्वीकारली जाईल (यशस्वी निविदाधारकांना) त्यांना सूचित करेल तसेच त्यामध्ये आवश्यक तपशील, वर्णन, सेवा आणि संबंधित स्वीकारलेल्या किंमतीं बाबत थोडक्यात माहिती दर्शवेल. तसेच निविदा जारीकर्ता कार्यादेश / निविदा स्वीकारल्या बाबत चे स्वीकार पत्र (Letter of Acceptance) जारी करेल.

आ) कार्यादेश/ स्वीकार पत्र (Letter of Acceptance) प्राप्त झाल्यानंतर यशस्वी निविदाधारक बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात आवश्यक असलेली कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) विहित मुदतीत सादर करेल अन्यथा बयाना ठेव (Earnest Money Deposit) जप्त होईल आणि स्वीकार पत्र/पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल तसेच सदर यशस्वी निविदाधारकास शासनाच्या काळया यादीत समाविष्ट करून त्यांचावर गुन्हा दाखल केला जाईल.

इ) स्वीकार पत्र / कार्य आदेशाची अधिसूचना म्हणजे करार होय.

**२३. कामगिरी सुरक्षा ठेव:-**

यशस्वी निविदाधारक स्वत: च्या खर्चाने नमूद केलेली कामगिरी सुरक्षा ठेव डिमांड ड्राफ्ट किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security) विहित मुदतीत निविदा जारीकर्ता कडे जमा करेल.

निविदा जारीकर्ता खालील कारणास्तव कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security) मधून वसूली करण्यास पात्र असेल.

अ) निविदादारा व्दारे अनियमिततेसाठी दंड म्हणून लावलेली कोणतीही रक्कम.

आ) निविदा जारीकर्ता कोणत्याही निविदाधारक किंवा त्याच्या कोणताही अभिकर्ता / कर्मचारी किंवा कर्मचा-यांचे कोणत्याही डीफॉल्टच्या आधारावर सरकारी / तृतीय पक्षाला जबाबदार असेल अशी कोणतीही रक्कम.

इ) कोणत्याही न्यायालय / ग्राहक मंच किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी किंवा त्यांच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीच्या आदेश / निर्णयाखाली केलेले कोणतेही देयक / दंड.

ई) इतर कोणत्याही थकबाकी रक्कम.

**२४. काम पूर्ण करण्याचा कालावधी :** यशस्वी ठेकेदाराने कार्यादेश दिल्यापासून तीन दिवसात व महामेळाव्याच्या एक दिवस अगोदर सर्व कामे व्यवस्थित पूर्ण करण्याची जबाबदारी यशस्वी ठेकेदाराची राहील.

**२५. देयक अदा करण्याबाबत अटी:-**

अभियाना मार्फत निर्धारित केलेल्या अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेल्या मोजमापे सह बिल सादर केल्याच्या दिनांका पासून जर त्यामध्ये काही त्रुटी नसल्यास दोन आठवड्यांत देय रक्कम GST सह RTGS किवा इतर प्रणालीद्वारे अदा केली जाईल.

**२६. आवश्यक बाबींचा विवरण आणि कामाची व्याप्ती:-** कृपया परिशिष्ट अ पाहावे

**परिशिष्ट - अ**

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत राज्यातील स्वयं सहायता समूहातील महिलांचा औरंगाबाद येथे महामेळावा करीता सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे:- कालावधी - ०१ दिवस.**

| अ. क्र. | व्यवस्थेच तपशिल | *परिमाण / एकक |
|---|---|---|
| ०१ | **अ) सुपरस्ट्रक्चर पत्र (G. I. Sheet) मंडप व्यवस्था: -** मंडपाचे माप ३००' x ७००' वॉटरप्रुफ पत्रयाचे (G. I. Sheet) छत असलेले भक्कम असा सुपरस्ट्रक्चर मंडप. आतिल बाजूस पांढरे सुशोभित कापड. बाजूस ०८ ते १० फूट उंचीपर्यंत कपडी पांढरा पडदा (कनात) मंडपात मधला गाळा कमीत कमी ८० फूट रुंदीचा असणे आवश्यक आहे. ७०० फूट लांबीमध्ये दोन्ही बाजुस १५ ते १८ फूटामध्ये ९ इंच ते १२ इंच व्यासाचे भक्कम पाईप कॉलम राऊंडमध्ये किंवा एम. एस. कॉलम व कैच्या वापरुन दोन्ही कॉलमध्ये ०३ फूट रुंदी व २० फूट लांबीची ब्रेसिंग लावणे आवश्यक आहे. तसेच नट-बोल्टची पक्की फिटींग करणे. सर्व कॉलम किंवा खांबाना कापडी खंबपट्टी किंवा कलर दिलेला असावा. आतील छत नवीन पांढ-या स्वच्छ कापडाव्दारे तायर करणे. छतास झालार लावून सुशोभित करणे. मंडपामध्ये व्हेंटीलेशनची व्यवस्था करणे. मंडपाचे मध्यभागी उंची कमीत कमी २२ फूट ते २४ फूट व दोन्हीकडेला १२ फुट ते १५ फुट उंची ठेवणे अथवा आवश्यकतेनुसार अतिमहत्वाचे / महत्वाचे व्यक्ती व इतर व्यक्तींकरीता झोन तयार करणे. स्टेजच्या मागील बाजुस व साईडला आवश्यक त्याठिकाणी सुरक्षीततेचा दृष्टीने १५ ते १८ फुट उंचीपर्यंत पत्रे लावणे व पत्र्याच्या पाठीमागे पांढरा कपडा लावणे व प्राप्त निर्देशानुसार बॅरीकेटींग लावणे तसेच वेळेवर प्राप्त होणा-या सुचनेनुसार व्यवस्था करावी लागेल. मंडपामध्ये पावसाचे पाणी आत येणार नाही याबाबत आवश्यक ती खबरदारी मंडप ठेकेदाराने घेणे व त्यासाठी मंडपामध्ये लागणारे सर्व साहित्य / मटेरिअल उच्च दर्जाचे तसेच चांगल्या स्थितीत असावे. तसेच सदर कामामध्ये गरजेनुसार जमिनीवरील साफसफाई, सपाटीकरण इत्यादी बाबीचा समावेश आहे (पत्रे, एम. एस. कॉलम, कैच्या, ब्रेटींग, नट-बोल्ट, कापडी पडदे, कापडी छत चांगल्या प्रतीचे असावे व लावण्यापूर्वी मान्य करुन घेणे आवश्यक आहे) .<br>**ब) कनात बांधणे:-** मंडपाचे बाजुने आवश्यक ठिकाणी बांधावयाचे कनातीसाठी सपोर्टसाठी पाईप बांबु अथवा गोल्टे उभे करण्यात यावेत. तसेच सदर कनातीमध्ये गॅप राहणार नाही अशा पध्दतीने लावणे. कापडाची उंची ०८ ते १० फूट उंचीची बांधणे आवश्यक आहे. | ३,००,००० चौ. फुट |
| ०२ | **स्टेज (व्यासपीठ) व्यवस्था करणे:-** स्टेज ६० फुट बाय ४० फुट आकाराचे व ४ ते ५ फुट उंचीचे एम. एस. चे चौकोनी ब्लॉक उभे करुन त्यांना व्यवस्थीत जोडणी करुन (नट बोल्टच्या सहाय्याने) त्याच्या वरती आय गरडर आडवे (योग्य अंतरावर) अंथरुन बांधणी करुन व त्याच्या वरती ३ फुट x ३ फुटाचे लाकडी बॉटम (राफटर) योग्य अंतरावर बांधून अखंड फळी अंथरुन त्याच्या वरती भक्कम प्लायवुड (एकाच लेव्हलमध्ये फिटींग करणेत यावे व खाली ३ x ३ इंची अंतरावर सपोर्ट देवून बांधणे करणे. स्टेजचे पाठीमागील भागात निविदा जारीकर्ता अधिकारी / प्रतिनीधी सांगतील त्या रंगाचा प्लेन कपडा बॅकड्रॉपला लावणे, तसेच स्टेजच्या उंचीचे व इतर बाजूस चॉकलेटी / सफेद रंगाचे कापड लावण्यात यावे. स्टेजवर नवीन वेल्वेट / सिंथेटीक कारपेट लावणे बंधनकारक राहील. (बॅनर अंदाचे - १५ x ६० फुट) स्टेजला नॅचरल फ्लॉवरची व्यवस्था करणे. (स्टेज बॅनर डिझाईन प्रमाणात करुन देणे).<br>**स्टेजवर चढण्याकरीता जिना (पाय-या):-** स्टेजवर बैठक व्यवस्थेकरीता किमान ०८ पाय-यांचा जिना आवश्यक आहे. अखंड प्लायवुड व बॉटम पट्टी वापरुन मजबूत स्वरुपात सुतारी काम करुन बनविणे आवश्यक आहे व त्याच्या वरती चांगल्या स्वरुपाची वेल्वेट / सिंथेटीक कारपेट लावणे. सदर स्टेज तयार झाल्यानंतर निविदाजारीकर्ताचे बांधकाम विभागामार्फत तपासून घेणे आवश्यक राहील. स्टेजचे वरील व समोरील बाजूस झालर इत्यादी लावण्याची व्यवस्था करणे व अतिरिक्त निर्देश देण्यात त्याप्रमाणे स्टेजची उभारणी करन देणे. स्टेज बॅनर निविदाजारीकर्ताचे मसुदयाप्रमाणे डिझाईन तयार करणे. | ५००० चौ. फुट |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ०३ | **स्टेज समोरील डी बॅरीकेटींग:-** ४ फुट उंचीचे बल्ली उभी करुन व ४ इंच बांबुची आडवी दोन ते तीन ठिकाणी बांधणी करणे आवश्यक आहे व त्याच्यावर पांढ-या कापडयाची बॅन्डेज करणे. सदर बॅरीकेटींग निविदाजारीकर्ताचे अधिकारी मार्फत तपासून घेणे. | १९००० र. फुट |
| ०४ | **वेल्वेट / सिंथेटीक कारपेट:-** बैठक व्यवस्थेसाठी संपूर्ण मंडपामध्ये वेल्वेट / सिंथेटीक कारपेट टाकणे. सदरहू कारपेटचे सॅम्पल सक्षम अधिका-याकडून प्रमाणित करुन घेणे. | ३,००,००० चौ. फुट |
| ०५ | **मंडप बॅरीकेटींग:-** साधारण ३०० रनिंग फुट बॅरीकेटींग आवश्यक आहे. ४ फुट उंचीचे बल्ली उभी करुन व ४ इंच बांबुची आडवी दोन ते तीन ठिकाणी बांधणी करणे आवश्यक आहे व त्याच्यावर पांढ-या कापडयाची बॅन्डेज करणे. सदर बॅरीकेटींग निविदाजारीकर्ताचे अधिकारी मार्फत तपासून घेणे. | १२०० र. फुट |
| ०६ | **बॉक्स टाईप स्वागत कमान:-** स्वागतासाठी आवश्यक त्याठिकाणी बॉक्स टाईप स्वागत कमान उभारणे. कमानीची रुंदी २५ फूट व उंची १८ ते २० फुट असावी. तसेच सदर कमानीस नवीन पांढरे कापड व सुशोभित कापड लावणे अथवा निर्देश देण्यात येईल त्याप्रमाणे स्वागत कमान उभारणे व सदर स्वागत कमानीस निविदाजारीकर्ताचे मसुदयाप्रमाणे बॅनर तयार करुन लावणे. (बॅनर साईज ३ फुट x २५ फुट). | ०१ नग |
| ०७ | **स्वागत कक्ष व माहीती कक्ष:-** स्वागत कक्ष १५ x १५ फुट मंडप एका युनिटमध्ये प्रत्येकी ०४ खुर्च्या व ०२ टेबल व खाली सिथेंटीक कारपेट टाकणे. | ०२ नग |
| ०८ | **फायबर/प्लास्टिक खुर्च्या:-** उच्च दर्जाच्या हात नसलेल्या फायबर/प्लास्टिक खुर्च्यांचा पुरवठा व माडणी करणे . सर्व बैठक व्यवस्था वाहतूक करणे व लावून देणे आवश्यक आहे. | १,००,००० नग |
| ०९ | **व्यासपीठावरील व्ही. आय. पीं. व्यक्तींकरीता सिंगल सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे ठेवणे:-** व्यासपीठावर महत्वाच्या / अतिमहत्वाच्या व्ही. आय. पी. व्यक्तींकरीता उच्च प्रतीचे सिंगल सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे नविन कव्हर असलेले पुरविणे व व्यासपीठावर त्यांची योग्यरीत्या मांडणी करणे. सदर नमूना प्रथम सक्षम अधिका-यांकडून प्रमाणित करुन घेणे. सर्व बैठक व्यवस्था वाहतूक करणे व लावून देणे आवश्यक आहे. | ३० नग |
| १० | **व्यासपीठावर टी–पॉय व्यवस्था करणे:-** मॉडयुलर फर्निचर मध्ये अथवा एस एस फ्रेम व त्यावर ग्लास अशा टी– पॉयची आकर्षक फुलांची फुलदानीसह व्यवस्था करणेत यावी . सर्व बैठक व्यवस्था वाहतूक करणे व लावून देणे आवश्यक आहे. | १४ नग |
| ११ | **थ्री सिटर सोफा:-** थ्री-सिटर एस एस सोफा कुशनसह व त्यावर स्वच्छ पांढरे कव्हर व्यवस्था करणे. सदर सोफा नमूना प्रथम सक्षम अधिका-यांकडून प्रमाणित करुन घेणे. सर्व बैठक व्यवस्था वाहतूक करणे व लावून देणे आवश्यक आहे. | १०० नग |
| १२ | **ग्रीन रूम:-** १५'x१५' - ०२ नग ग्रीन रूम - प्रत्येकी ०१ सोफा, ०४ खुर्च्या व ०१ टेबल व ०१ आरशासह बंदिस्त मंडप व्यवस्था करणे, तसेच सदर ग्रीन रूममध्ये सिंथेटीक रेड कारपेट टाकणे. | ०३ युनिट |
| १३ | **पोलीसांकरीता चेकींग रुम:-** १० फुट x १० फुट साईजचे काळया कापडाचे डबल अस्तर लावून एका बाजूस सरकता पडदा लावणे. आतमध्ये लाईटची व्यवस्था करणे. एका युनिटमध्ये प्रत्येकी ०४ खुर्च्या व खाली तळास सिथेंटीक कारपेट टाकणे. | ०१ युनिट |
| १४ | **विद्युत व्यवस्था करणे:-** मंडपामध्ये ८५ वॅट सी. एफ. एल. वायरींग व होल्डरसह - ४०० नग, सिलींग फॅन वायरींगसह - २०० नग, १५ ए प्लग स्वीच बोर्ड वायरींगसह - ०७ नग, १५० वॅट मेटल हॅलाईड / एलईडी लाईट वायरींग व फिटींगसह - १०० नग, ६३ ए ॲम्पिअर मेनस्वीच वायरींगसह मेन सप्लायकरीता - ०५ नग, ३२ ए ॲम्पिअर मेनस्वीच वायरींगसह मेन सप्लायकरीता - ०७ नग,आऊटगोईंग मेन सप्लाय कंट्रोल बोर्ड RCCB / ELCB सह व वायरींगसह०१ नग, मंडप व स्टेज लाईट व्यवस्थेकरीता ५० स्क्वेअर एम.एम.ची केबल टाकणे - ५०० मीटर, कॉपर अर्थ प्लेटची अर्थिंग करणे - ०२ नग, ०५/१५ ॲम्पिअर पॉवर पॉईट एक्सटेंशन बोर्ड - ०४ नग, १२५ के.व्ही.ए.जेनसेट इंधनासह पुरविणे. | ०१ युनिट |

<table>
<tr><td>१५</td><td>साऊंड सिस्टीम व्यवस्था करणे:- कार्यस्थळावर तात्पुरत्या स्वरुपाचे PAS (Public Address System) साऊंड सिस्टीम व्यवस्था करावयाची आहे. त्यासाठी नामांकित दर्जाचे साऊंड सिस्टीम साऊंड बॉक्ससह वापरणे, पॉवर ॲम्प्लीफायर व त्यासंबंधी आवश्यक उपकरणे वापरणे. मंडपाचे अंदाजित आकारमान ३,००,००० स्के. फुट इतके आहे. असून त्याकरीता खालीलप्रमाणे मटेरीअल आवश्यक आहे. यासाठी व्यवस्थित वायरींग व अर्थिंग करणे गरजेचे आहे. तसेच साऊंड इंजिनिअर (साऊंड ऑपरेटर) उपस्थित ठेवणे आवश्यक आहे. या सिस्टीमची ट्रायल ०१ दिवस अगोदर देणे व याकरीता बॅकअप सिस्टीम देणे आवश्यक आहे.
<table>
<tr><th>Sr.No.</th><th>Particular</th><th>*Make</th><th>Quantity</th><th>Model</th></tr>
<tr><td>01.</td><td>Line Array</td><td>RCF,JBL,DAS</td><td>12</td><td>HDL50,VTX,AERO40</td></tr>
<tr><td>02.</td><td>SUB</td><td>RCF,JBL,DAS</td><td>6</td><td>HDL50,VTX,AERO40</td></tr>
<tr><td>03.</td><td>Delay Top</td><td>RCF,JBL</td><td>16</td><td>V45,STX800,SRX725</td></tr>
<tr><td>04.</td><td>Floor Monitor</td><td>QSC,JBL</td><td>8</td><td>K12,715M</td></tr>
<tr><td>05.</td><td>Podium Mic</td><td>SHURE</td><td>4</td><td>C418</td></tr>
<tr><td>06.</td><td>Battery Podium mic</td><td>AHUJA</td><td>2</td><td>-</td></tr>
<tr><td>07.</td><td>Cordless Mic</td><td>SHURE,AKG</td><td>4</td><td>58,MINI40</td></tr>
<tr><td>08.</td><td>Digital Console</td><td>BEHRINGER, SOUND CRAFT</td><td>1</td><td>X32,SI impact</td></tr>
<tr><td>09.</td><td>Trumpet</td><td>AHUJA</td><td>50</td><td>-</td></tr>
</table>
*समतुल्य मेक चालू शकेल. वरील साहित्य अंदाजित आहे परंतु निवड झालेल्या ठेकेदाराने गरजेनुसार व्यवस्था करणे बंधनकारक आहे.</td><td>०१ युनिट</td></tr>
<tr><td>१६</td><td>व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी:- सदर कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटींग व स्टिल फोटोग्राफी करणे. सदर व्हिडीओ शुटींग व फोटो हे प्रत्येकी स्वतंत्र डि. व्हि. डी. मध्ये निविदाजारीकर्ताकडे जमा करणे. (व्हिडीओ शुटींग सेटअप - ०५ नग व्हिडीओ शुटींग कॅमेरे फोटोग्राफरसह, एच. डी. मिक्सर - ०१ नग, स्टिल फोटोग्राफी कॅमेरे फोटोग्राफरसह, कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटींग एल. ई. डी. स्क्रिन / वॉलवर लाईव्ह प्रक्षेपीत करणे).</td><td>०१ युनिट</td></tr>
<tr><td>१७</td><td>एल. ई. डी स्क्रिन / वॉल:- मंडपामध्ये आवश्यक त्याठिकाणी लोखंडी पाईपचे मजबूत स्टॅण्डसह व त्यावरती लेव्हलमध्ये प्लायवूड टाकणे. ८ x १२ साईजचे एल. ई. डी. स्क्रिन जमिनीपासून किमान ४ ते ५ फुट उंचीवर (रायझर झालरसह) लावण्याची व्यवस्था करणे.</td><td>१५ नग</td></tr>
<tr><td>१८</td><td>तात्पुरत्या मुता-यांची व्यवस्था करणे:- कार्यस्थळावर पत्रा पार्टीशनमध्ये अथवा रेडीमेड फायबर कॅबीनचे पोर्टेबल महिला व पुरुष असे स्वतंत्र मुता-यांची व्यवस्था करणे. त्याकरीता आवश्यक ड्रेनेज अथवा योग्यती व्यवस्था करणे, तसेच सदर ठिकाणी पाण्याच्या टाक्या ठेवून पाण्याची व्यवस्था करणे.</td><td>३०० नग</td></tr>
<tr><td>१९</td><td>टावर २ टन क्षमतेचा एसी मुख्य स्टेज व ग्रीनरूम करीता</td><td>६ नग</td></tr>
<tr><td>२०</td><td>६० लिटर क्षमतेची प्लास्टिक स्विंग डस्ट बिन</td><td>१०० नग</td></tr>
</table>

टिप:- उपरोक्त नमूद सर्व व्यवस्था भाडेतत्वावर करावयाची असून कार्यक्रमाचे ०१ दिवस आगोदर सकाळी १०.०० वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच प्राप्त निर्देशाप्रमाणे वेळोवेळी निविदाजारीकर्ताचे अधिका-यांनी सुचीत केलेप्रमाणे कामे करणे.

*वरील नमूद केलेले परिमाणे अंदाजित असून त्यामध्ये व इतर बाबींमध्ये संख्येत गरजेनुसार कमी/जास्त किवा रद्द केला जाईल व त्यानुसार देयक अदा करण्यात येईल.

**<u>सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व अनुषंगीक व्यवस्था उभारणीच्या निविदेच्या इतर अटी व शर्ती:-</u>**

1. निविदेतील मंडपापेक्षा जादा आकाराचा अथवा वाढीव मंडप उभारणी करणेबाबत निविदा जारीकर्ताकडून सुचना / आदेश देण्यात आल्यास, मंजूर दरानेच जास्तीचा / वाढीव मंडप उभारणीचे काम निविदाधारकांस करावे लागेल. तसेच, परिशिष्टात नमुद केलेल्या मंडपापेक्षा कमी आकाराचे मंडप तसेच इतर व्यवस्था कमी झाल्यास उदा. मंडप, स्टेज, मॅटींग, कारपेट, कमान, बॅरेकेडींग, ग्रीन रूम, वेटींग लॉन्ज, साउंड सिस्टीम, विद्यूत व्यवस्था, एल.ई.डी स्क्रीन, कुलर, सोफा, खुर्ची इ. व्यवस्था अंशत: अथवा पूर्णत: कमी करावी लागल्यास, त्यानुसार मंजुर दराने रक्कम कमी केली जाईल. प्रत्यक्षात ज्या आकाराचे मंडप उभारणी तसेच वर नमूद इतर व्यवस्था करण्यात आली असेल, त्यानुसार प्रत्यक्ष केलेल्या कामाचे मोजमापानुसार व्यवस्था उभारणीची रक्कम मंजुर दराने अदा केली जाईल याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी. या निविदेमधील स्कोप ऑफ वर्क (कामे) कमी अथवा वाढविणेचा अथवा रद्द करणेचा अधिकार / हक्क निविदा जारीकर्ता राखून ठेवत आहे.
2. निविदेतील मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच कार्यादेश दिल्यानंतर मंडप उभारणीचे काम नाकारल्यास निविदा जारीकर्ता कडे जमा असणारी बयाणा रक्कम / अनामत रक्कम जप्त करण्यात येईल तसेच शासनाच्या काळ्या यादीत समावेश करण्यात येईल तसेच यशस्वी ठेकेदारावर कायदेशीर कार्यवाही करणेत येईल.
3. सादर करावयाचे सर्व दर हे विना वस्तू व सेवा कर (Without GST) देणेत यावे.
4. सरकारी नियमानुसार आवश्यक कर कपात केले जातील.
5. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप उभारणीसाठी वापरण्यात येणारे साहित्य उदा. एम.एस.पाईप, एम. एस. कॉलम, ताडपत्री, लोखंडी कैच्या, जी. आय. पत्रे, बांबु, गोल्टे, बल्ल्या, कापड इ. मजबुत, टिकाऊ व सुरक्षिततेच्या दृष्टी योग्य असलेले वापरावे लागेल.
6. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडपाचे छताचे कापड पांढरे, स्वच्छ व सुशोभित असावे, शक्यतो नवीन कापड वापरणे आवश्यक आहे. फाटके, खराब, वेडीवाकडी शिवण असलेले कापड नाकारण्यात येईल.
7. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडपाचे मोजमाप बाहेरील एम. एस. कॉलम / पाईपचे आत मोजले जातील.
8. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडपाचे छतासाठी वापरण्यात येणारे एम. एस. कॉलम / पाईप, कैच्या, पत्रे तसेच कापड स्वच्छ व सुशोभित असल्याबाबत प्रथम बांधकाम विभागाकडून तपासून घ्यावे व नंतर त्याची बांधणी करावी. खराब कापडाची बांधणी केल्यास व नंतर ते कापड बदलावे लागल्यास त्याबद्दल जादा भरपाई अथवा रक्कम अदा केली जाणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकावर राहिल. तसेच यशस्वी ठेकेदार यांनी मंडप उभारणीचे साहीत्य बांधकाम विभागामार्फत तपासून घेऊन कार्यालयीन अधिकारी यांनी परवानगी दिलेनंतरच मंडप उभारणीचे काम सुरु करावे.
9. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडपाचे साहित्य आणणे-नेणे, त्याची वाहतूक करणे, ते सांभाळणे, नैसर्गिक आपत्तीपासून व अपघात यापासून त्याचा बचाव करणे हे सर्वस्वी यशस्वी ठेकेदाराची जबाबदारी असून, त्याबाबत कार्यालयामार्फत कुठल्याही स्वरुपात मदत / नुकसान भरपाई दिली जाणर नाही. तसेच मंडप उभारणी करतेवेळेस बॅरेकेड / दोर लावावेत, जेणेकरुन नागरिकांना किंवा कोणास मंडप उभारणीचा त्रास होणार नाही. काम चालू असतांना कोणास इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. याबाबत काही अपघात घडल्यास व त्यामुळे कुणासही काही इजा झाल्यास, जिवीत अथवा वित्त हानी झाल्यास त्यास मंडप यशस्वी निविदाधारक सर्वस्वी जबाबदार राहील.
10. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडपाचे उभारणीचे कालावधीमध्ये मंडप झुकल्यास, पडल्यास, कापड फाटल्यास अथवा इतर कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास ते त्वरीत ठेकेदाराने स्वखर्चाने दुरुस्त करुन / बदलून द्यावयाचे आहे.
11. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप उभारणीकरीता मंडपाची फ्रेम तयार झालेनंतर छताकरीता कापड बांधणेपूर्वी सदर मंडपाची फ्रेम / स्ट्रक्चर बांधकाम विभागामार्फत तपासणी करुन घ्यावे.
12. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप, बॅरेकेडींग, स्टेज तसेच अनुषंगीक व्यवस्था केलेनंतर ती भक्कम स्वरुपाची असलेबाबतची खात्री बांधकाम विभागामार्फत करुन घेणेत यावी अन्यथा चर्चासत्र समारंभ कालावधीत काही अडथळा आल्यास

त्याची सर्वस्वी जबाबदारी यशस्वी ठेकेदाराची राहील व संबंधीत यशस्वी ठेकेदार दंडास पात्र ठरेल याची नोंद घ्यावी.

13. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप उभारणीचे कालावधीमध्ये / मंडपाची उभारणी पूर्ण झालेनंतर, मंडपाची देखरेख अथवा देखभाल दुरुस्ती करणेसाठी कर्मचारी / मजूर ठेकेदाराने कार्यस्थळावर नियमित हजर ठेवावयाचे आहेत. तसेच मंडपाविषयी सूचना / आदेश देणेसाठी व त्या अंमलात आणणेसाठी एक जबाबदार कर्मचाऱ्याची नेमणूक यशस्वी ठेकेदाराने करावयाची असून, या संबंधीत जबाबदार कर्मचाऱ्याने वेळोवेळी बांधकाम विभागाशी संपर्क साधावयाचा आहे.

14. सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप उभारणीचे दर भरतांना सर्व समावेशक असे दर द्यावेत. मटेरीयल, वाहतूक, हमाली अथवा इतर कोणताही खर्च कार्यालयामार्फत वेगळा दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

15. सर्व बिले लेखाशाखेमार्फत RTGS व्दारे अदा करण्यात येत असल्याने, आपले / आपल्या संस्थेचे बँकेत ज्या नांवाने बँक खाते आहे त्या बॅंकेचा कॅन्सल्ड चेक, बॅंक खाते नंबर, IFSC कोड इ. खात्यासंबंधीत माहिती देणे गरजेचे आहे, जेणे करुन बिल अदा करणेस अडचण येणार नाही.

16. सरकारी नियमानुसार आपणांस आपला स्वत:चा / फर्मचे पॅन कार्डची छायांकित प्रत, जीएसटी रजिस्ट्रेशनची प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

17. मंडप उभारणीचे बिल सादर करणेपूर्वी, निविदा जारीकर्ता प्रतिनिधी व यशस्वी ठेकेदाराने एकत्रपणे मंडपाची मापे घ्यावयाची असून त्याबाबतचा अहवाल स्वाक्षरीनिशी कार्यालयात जमा करावयाचा आहे व या अहवालाप्रमाणेच निविदाधारकाने बिल तयार करावयाचे आहे.

18. कामाचे बिल सादर करतांना, कार्यादेशातील वर्णनाप्रमाणे पूर्ण तपशील असणे आवश्यक आहे. संक्षिप्त अथवा त्रोटक स्वरुपात उल्लेख करु नये, अन्यथा बिल आदा केले जाणार नाही.

19. कोणती ही निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा पूर्णत: अथवा अंशत: मंजूर करणेचा अथवा नामंजूर करणेचा हक्क निविदा जारीकर्ताने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे निविदा जारीकर्तावर बंधनकारक असणार नाही.

20. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणेचा वा जादा अटी / शर्ती विहीत करण्याचा अधिकार निविदा जारीकर्तानें राखून ठेवला आहे.

21. निविदाधारकांच्या कोणत्याही अटी व शर्ती निविदा जारीकर्तावर बंधनकारक राहणार नाहीत तसेच त्यांचा विचार केला जाणार नाही.

22. उपरोक्त अटी व शर्तीपैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी शर्तींचा भंग झाल्यास बयाणा / अनामत रक्कम निविदा जारीकर्ता कडे जमा होणेस पात्र राहिल.

23. मंडप, कापड / पत्रा पार्टीशन, बॅरेकेटींग, मॅटींग, साउंड सिस्टीम, लाईटस्, फॅन, कुलर, सोफा, खुर्ची, स्वागत कमाणी, स्टॅन्डसह एल. ई. डी. स्क्रीन, विद्यूत व्यवस्था व स्टेज इत्यादी उभारणीचे परिशिष्टामध्ये नमूद केलेप्रमाणे मंडपाची उभारणी / काम न केल्यास मंडपाचे देयक अदा केले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

24. मंडप उभारतेवेळी अथवा मंडप उभारलेनंतर त्यासंबंधी काही अपघात झाल्यास मंडप पडल्यास अथवा त्यामुळे कुणाही व्यक्तीस काही इजा झाल्यास अथवा जिवीतहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मंडप ठेकेदारावर राहील याची कृपया नोंद घ्यावी.

25. निविदा जारीकर्ताला आवश्यक वाटल्यास प्रत्येक बाबींचे अथवा काही बाबींचे कामे विभागून देण्याचा हक्क निविदा जारीकर्ता कडे राखून ठेवण्यात येत आहे.

26. मंडपाचे परिमाणात अथवा मंडप उभारणीचे स्थानात बदल करणेचा हक्क निविदा जारीकर्ताने राखून ठेवलेला आहे. प्रत्यक्ष उभारणी केलेल्या मंडपाचे, कामाचे व प्रत्यक्ष पूरविलेल्या साहीत्याचे / वस्तूंचे परिमाणानुसार व मोजमापानुसार देयक अदा करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. याबाबत कुठलीही तक्रार ऐकली जाणार नाही.

27. मंडप उभारणीचे व इतर कामे दिलेल्या वेळेत पूर्ण न केल्यास यशस्वी निविदाधारकाचे देयक अदा करण्यात येणार नाही व निविदामध्ये नमूद केलेल्या इतर तरतुदीनुसार कार्यवाई करण्यात येईल.

28. मंडपामध्ये पावसाचे पाणी आत येणार नाही याबाबत मंडप यशस्वी ठेकेदाराने खबरदारी घेणे तसेच मंडपाचे छतातुन पाणी गळती झाल्यास व सदर ठिकाणाचा मंडप त्वरीत दुरूस्त न केल्यास मंडपाचे देयकात कपात करणेत याची कृपया नोंद घ्यावी, किती रक्कम कपात करावयाची याबाबत निविदा जारीकर्ता निर्णय घेईल.

29. ई-निविदा सादर झालेनंतर सदर निविदेची वैधता ही ९० दिवस इतकी असेल. निविदाधारकाचे परवानगीने व त्यांचे लेखी संमतीने सदर निविदेची वैधता वाढविता येईल.

महत्वाचे:

- निविदा जारीकर्ता कार्यालयाकडून कार्यक्रमाचे वेळापत्रक निश्चित झाल्यानंतर ०१ संपूर्ण दिवस पुर्वीच / आगोदर आपणाला निविदेतील नमूद सर्व कामे ठेकेदाराने पुर्ण करून द्यावी लागतील. त्यानंतर सुरक्षा यंत्रणेकडून / निविदा जारीकर्ता कडून काही सुधारणा / बदल आवश्यक असल्यास त्यानुसार तात्काळ ते करून द्यावी लागतील.
- निविदेमध्ये नमूद केलेल्या कामाव्यतीरीक्त काही कामे करणे आवश्यक असल्यास, अशा कामांचा निविदेमध्ये समावेश नसल्यास त्याकामाचे बीलाची रक्कम निविदा जारीकर्ता मार्फत निश्चित करणेत येवून अदा करणेत येईल.
- मंडप व इतर अनुषंगीक कामांचे मोजमाप निविदा जारीकर्ता प्रतिनिधी व निविदाधारकांनी एकत्रपणे करून घेतल्यानंतर काढून घेण्यास सुरूवात करावी.

  मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेच्या उभारणीस कोणत्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नाही. तथापी या कालावधीत परिस्थितीनुरुप बदल करण्याचा अधिकार निविदा जारीकर्तातर्फे राखून ठेवण्यात येत आहे. तसेच मंडपाचे होणारे प्रत्यक्ष कालावधीनुसार बिल अदा करणेत येईल याची नोंद घेण्यात यावी.

**फॉर्म -१ (Bid Form-1)**

निविदा फॉर्म
(निविदाधारकाच्या लेटरहेडवर सादर करणे)

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोनान्नती अभियान
५वा मजला,सिडको भवन ,दक्षिण बाजू
सीबीडी बेलापूर ,नवी मुंबई

माननीय महोदया ,

निविदा दस्तऐवजाची तपासणी करून, आम्ही खालील स्वाक्षरी करणारे पावती देतो कि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत राज्यातील स्वयं सहायता समूहाच्या महिलांचा औरंगाबाद येथे महामेळावा करीता सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी सेवा पुरवठादार संस्था निवड करण्यासाठी निविदा सादर करत आहोत. आमची निविदा उपरोक्त नामांकित निविदा दस्तऐवजाशी पूर्ण सुसंगत आहे आणि सादर केलेल्या किंमती आमच्या व्यावसायिक लखोटा या निविदेचा भाग बनलेला आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत राज्यातील स्वयं सहायता समूहाच्या महिलांचा औरंगाबाद येथे महामेळावा करीता सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी सेवापुरवठादार संस्था निवड करण्याबाबत निविदा स्विकारण्यात आल्यास निविदा दस्तऐवजात नमूद केलेली सर्व सेवापुरवठा करण्याचे आम्ही हमी देत आहोत.

आमच्या निविदा स्वीकारल्या गेल्यास, आम्ही कामगिरी सुरक्षा रक्कम /अनामत रक्कम (Performance Security Deposit) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्यानुसार निर्धारित वेळेत सादर करू.

निविदा दस्तऐवजात निर्दिष्ट निविदा वैधता कालावधीसाठी आम्ही या निविदाचे पालन करण्यास सहमत आहोत आणि ते आमच्यावर बंधनकारक राहील आणि त्या कालावधीच्या समाप्तीपूर्वी कोणत्याही वेळी आपण आमची निविदा स्वीकारू शकता. औपचारिक अंतिम करार तयार होईपर्यंत आणि आमच्या द्वारे अंमलात येईपर्यंत, निविदाधारकाची लिखित स्वीकृती आणि निविदा स्वीकारासह ही निविदा आपल्या दरम्यान बंधनकारक करार तयार करेल. आम्ही समजतो की आपल्याला प्राप्त होणारी सर्वात कमी किमतीची निविदा किंवा कोणतीही निविदा आपण स्वीकारण्या करिता बांधील नाही .

स्वाक्षरी -------------------------------

तारीखः

च्या क्षमतेत:

सही करण्यासाठी अधिकृत किंवा अधिकृत व्यक्ती च्या वतीने

निविदादाराचे स्वाक्षरी आणि शिक्का

## फॉर्म - २ (Bidders Information : Form-2)

निविदाधारक माहिती

| तपशील | तपशील |
|---|---|
| निविदादाराचे नाव | |
| टेलिफोन आणि ईमेल आयडीसह पूर्ण पत्ता | |
| निविदा संबंधित संपर्क तपशील<br>नाव आणि संपर्क तपशील | |
| व्यवसायाच्या स्थापनेचा वर्ष | |
| निविदाधारकाची स्थिती ( वैयक्तिक / मालकी / भागीदारी / खाजगी मर्यादित / सोसायटी इ. | |
| पॅन क्रमांक (PAN No.) | |
| वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | |
| तीन आर्थिक वर्षातील वार्षिक उलाढाल | |
| शासकीय /निमशासकीय / खाजगी संस्थेसाठी निविदाकार यांनी या पध्दतीचे मंडप उभारणी व इतर अनुषंगिक कामे केल्याचा किमान रु.९० लक्ष अथवा त्यावरील रकमेचे किमान ०१ काम केल्याबद्दलची माहिती | संस्थेचे नाव:<br>पत्ता:<br>कामाची रक्कम :<br>कार्यादेश दिनांक :<br>कार्यक्रम सुरु दिनांक :<br>कार्यक्रम समाप्ती दिनांक: |

निविदादाराचे स्वाक्षरी आणि शिक्का

FORM -3

**Format for submission of Turnover certificate on CA firms letter head**

TO WHOMSOEVER IT MAY CONCERN

This is to certify that M/s. (name of bidders firm) is having registered office at (detailed office address of bidder). The turnover of M/s. (Name of bidders firm) for the three financial years based on Audited Statement is as under

| Sr. No. | *Financial Year | Turnover in lakhs |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |
| | Average Turnover | |

Signature of the Chartered Accountant

Name of the Firm

Registration No.

Date:

Place:

(Seal of the Chartered Accountant)

*Please mention financial year either 2015-16,16-17 & 17-18 OR 2016-17,17-18 & 18-19

## फॉर्म -४

## घोषणा पत्र (Declaration)

(रु.१०० /- च्या गैर-न्यायिक मुद्रांक पेपरवर)

मी/आम्ही.................................................व्यवसायाचा नाव ........................................व्यवसायाचा पत्ता................................................................................................................................ ........................................................................ जाहीर करतो कि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत स्वयं सहायता समूहाच्या महिलांचा औरंगाबाद येथे महामेळावा करीता सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी सेवा पुरवठादार संस्था निवड करण्याबाबत निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचा मी / आम्ही पालन करेन. तसेच मंजूर झालेले दर हे करार कालावधी दरम्यान वैध राहतील.

मी / आम्ही असे घोषित करतो की मी/आम्ही कोणत्याही न्यायालयाच्या कायद्याव्दारे दोषी ठरवले नाही किंवा मी / आम्ही कोणत्याही राज्य सरकार किंवा केंद्र सरकार विभाग / केंद्रशासित प्रदेश / स्थानिक प्राधिकरण / केंद्र व राज्य सरकार यांच्याद्वारे मान्यताप्राप्त सरकारी संस्था द्वारे या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याच्या दिनांक पर्यंत काळी सूचीबद्ध (Black listed) केलेली नाही.

मी / आम्ही सहमत आहे की निविदा जारीकर्ता आमच्याकडे पुरविलेल्या माहितीची तपासणी/ सत्यापन करताना सादर करण्यात आलेली माहिती खोटी असल्याचे सिद्ध झाल्यास तसेच आमच्या द्वारे निविदा दस्तेवज मध्ये नमूद अटी आणि नियमांचे पालन करण्यात आले नाही तर बयाना रक्कम (Earnest Money Deposit) आणि कामगिरी सुरक्षा रक्कम /अनामत रक्कम (Performance Security Deposit) जप्त करेल आणि तीन (3) वर्षे कालावधी करिता मला /आम्हाला काळ्या यादित समाविष्ट करेल.

दिनांक :-

शिक्का

निविदाधारकाची अधिकृत स्वाक्षरी

**फॉर्म -५**

**(Form-6 Experince Details)**

शासकीय /निमशासकीय / खाजगी कार्यालयास सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उपलबध करून दिलेल्या कामाच्या अनुभवाचा तपशिल

| अक्र. Sr. No. | पुरवठा आदेश देणाऱ्या कार्यालयाचे नाव व पत्ता Client name and address | सेवा पुरवठा केल्याचा तपशील Details of service provided | पुरवठा आदेश /करार क्र. व तारीख Supply order / Contract Number and Date | सेवा पुरवठा करण्याचा कराराची मुदत Duration of contract | | सेवा करण्यात आलेली एकूण रक्कम Value of the contract |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | from | To | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

निविदाधारकाची अधिकृत स्वाक्षरी

**Signature and seal of the Bidder**

टीप:

वरील माहितीच्या अनुषंगाने सर्व दस्त ऐवज पुरवठा आदेश/कराराची प्रत व देयक किंवा काम पूर्ण केल्याचे संबधित विभागाचे प्रमाणपत्र अपलोड करणे आवशक आहे.